


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ४ सप्टेंबर १९४६ अंक ३६

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

## विविध माहिती

**रूरल डे. बोर्डांची सभा**—मुंबई प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डांची सभा ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत पुणें येथें भरली होती. सभेचें अध्यक्षस्थान कृषिमंत्रि, श्री. एम्. पी. पाटील, ह्यांनीं स्वीकारलें होतें. खेडेगांव धान्याच्या बाबत स्वयंपूर्ण करण्याचें आपलें धोरण सरकारतर्फे स्पष्ट करण्यांत आलें, सहकारी शेतीच्या प्रश्नाचा तपशीलवार विचार करण्यासाठीं सरकारनें एक समिति नेमली आहे, असें सभेंत सांगण्यांत आलें.

**जिंजर रॉजर्सची कमाई**—जिंजर रॉजर्स ह्या नटीस तिच्या नव्या चित्रपटांतील कामाबद्दल प्रत्येकीं ६ लक्ष रुपये व चित्रपटाच्या उत्पन्नांत ६०% वाटा मिळावयाचा आहे. हॉलिवुडच्या इतिहासांत इतकी कमाई दुसऱ्या कोणास आजवर झालेली नाहीं.

**वार्धक्य आलें, तरी टॅक्सीचा धंदा चालू**—लंडनमधील लायसेन्स असलेल्या टॅक्सी ड्रायव्हरांपैकीं २१ ड्रायव्हरांचें वय ८० वर्षांपेक्षा जास्त आहे.

**ब्रह्मदेश तांदुळाची निर्यात वाढविणार**—हवामान जर फार प्रतिकूल नसेल तर तांदुळाची निर्यात ५० टक्क्यांनीं तावडतोब वाढविण्याचें ब्रह्मी सरकारनें ठरविलें आहे. सध्यां त्या देशांतून रोजीं होणारी १२०० टनांची निर्यात आतां १८०० टनांपर्यंत वाढविली जाईल.

**विक्रीकर कायद्यांतील संदिग्ध मुद्यांचें स्पष्टीकरण**—मुंबईचे असिस्टंट सेल्स टॅक्स कमिशनर मि. गोलवाला यांनीं विक्रीकर कायद्यांतील संदिग्धता पुढील उदाहरणें देऊन दूर केली आहे:–( १ ) जेवणाचा व राहण्याचा आकार एकत्रित आकारला असेल तर सर्व आकारावर कर द्यावा लागेल परंतु जेवण्याचे व राहण्याचे आकार वेगवेगळे दाखविले असतील तर राहण्याच्या आकारावर कर द्यावा लागणार नाहीं. ( २ ) फक्त छपाईचेंच काम केलें तर कर द्यावा लागणार नाहीं परंतु छपाई व कागदाची किंमत एकत्र आकारली असेल तर सर्व आकारावर कर द्यावा लागेल. ( ३ ) शिंप्याला शिलाईवर कर भरावा लागणार नाहीं, परंतु त्यानें जर कापड पुरविलें असेल, तर तो करास पात्र होईल. ( ४ ) गिऱ्हाइकांकडून कर वसूल करण्याची जबाबदारी कायद्यानें जरी दुकानदारावर सोपविली नसली तरी गिऱ्हाइकांवर कर लादला गेल्यास त्यांना तो द्यावा लागेल, व त्यांनीं तो न दिल्यास दुकानदार गिऱ्हाइकांना माल विकण्याचें नाकारूं शकतील. ( ५ ) नियंत्रित किंमतींत विक्रीकर धरलेला नाहीं. किंमत आकारतांना विक्रीकर वेगळा दाखवावा कीं नाहीं हें दुकानदारांनीं ठरवावें. ( ६ ) १ ऑक्टोबरपूर्वी विकलेल्या मालाच्या किंमतीच्या १ ऑक्टोबरनंतर होणाऱ्या वसुलीवर कर द्यावा लागणार नाहीं.

**चीनमध्यें डॉक्टर पाहिजेत**—चीनमध्यें जाण्यास तयार असणाऱ्या घसा, नाक, कान यांच्या रोगांचे तज्ञ व इतर हिंदी डॉक्टर ह्यांची यादी करण्यास 'अनरा' नें हिंदुस्थान सरकारास विनंति केली आहे. अधिक माहिती हवी असणारांनीं, ऑनररी सेक्रेटरी, थीबे मेडिकल असोसिएशन, ७२ विजय नगर, दादर या पत्त्यावर विचारणा करावी व आपले अर्ज सर्जन जनरल, मुंबई यांजकडे पाठवावेत.

**वॉशिंग्टन येथें वर्ल्ड बँकेची सभा**—वर्ल्ड बँक व इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या गव्हर्नरांच्या बोर्डानें वॉशिंग्टन येथें २७ सप्टेंबर रोजीं भरणाऱ्या सभांना प्रतिनिधि पाठविण्याकरतां रशिया, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, कोलंबिया, लिबेरिया, हाइटी व व्हेनेज्युएला ह्या राष्ट्रांना निमंत्रणें पाठविलीं आहेत.

**विद्युत्‌लहरींच्या नियंत्रणानें शेतीः**— इंग्लंडमध्यें रॉयल एरोनॉटिकल संस्थेच्या तीन तज्ञांनीं हर्टफोर्डशायर येथील १४ एकर जमीन विद्युत्‌लहरींच्या सहाय्यानें नांगरिली. ह्या ट्रॅक्टरनें ६५ यार्ड लांबीचे उभे आडवे तास दहा मिनिटांत पाडले. ट्रॅक्टरपासून १०० यार्ड अंतरावर विद्युत्‌लहरी फेकणारी गाडी उभी होती. हवेपासून संरक्षित अशा केबीनमध्यें बसून, एकाच वेळीं एकामागे एकेक असे ६ ट्रॅक्टर चालवितां येतील असें मत तज्ञानें प्रदर्शित केलें.

**विक्रीकर--महत्त्वाची सवलत**—ज्यांची वार्षिक उलाढाल ३० हजार रुपयांपेक्षा कमी आहे, अशा व्यापाऱ्यांस विक्रीकर द्यावा लागणार नाहीं, असें जाहीर झालें आहे. मूळ कायद्यांतील मर्यादा १० हजारांची होती.


दि सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँन्ड मॉर्गेज बँक लि.,
कराड

### भागीदारांना नोटीस

बँकेच्या भागीदारांची अकरावी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख २२–९–४६ रोजीं सायंकाळीं चार वाजतां रावसाहेब कल्याणी यांचे इमारतींत बँकेचे ऑफिसमध्यें भरणार आहे. त्यावेळीं बँकेचा सन १९४५–४६ सालचा अहवाल व ताळे बंद मजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, पोट नियम दुरुस्ती वगैरे कामें केलीं जातील तरी सदर वेळीं सभासदांनीं येण्याचें करावें, अशी विनंती आहे.

कराड
२७-८-१९४६

आ. ना. कल्याणी
चेअरमन, कराड

### व्यापाऱ्यांचे माहितीकरतां

( १ ) ता. १ सप्टेंबरपासून बिस्किटांचे दरांत बदल करण्यांत आला आहे. दरपत्रक मागवावें.

( २ ) पुरेशा मालाचे अभावीं अद्याप मागणीइतका पुरवठा होऊं शकत नाहीं. तसेंच वाहतुकीवरही नियंत्रणें आहेत. त्यामुळें आमचे जे जुने घाऊक स्टॉकिस्ट आहेत त्यांनाच माल पाठवितां येणें शक्य आहे. इतर व्यापारी ग्राहकांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडून माल घ्यावा.

( ३ ) कांहीं प्रमुख स्टॉकिस्ट व एजंटांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत.

( १ ) मुंबईः—मे. महाजन ब्रदर्स, साठे बिस्किट डेपो, आनंदनिवास, भांगवलवाडी, गिरगांव मुंबई नं. ४.

( २ ) गुजराथ ( अहमदाबाद सोडून ):—श्री. शिवलाल जी. भारतिया, १४ चिपळूणकर बिल्डिंग, पांजरापोळ १ ली लेन, मुंबई नं. ४.

( ३ ) नाशिक जिल्हाः—मे. लाहोटी ब्रदर्स, राजस्तान चौक, संगमनेर ( अहमदनगर जिल्हा ).

( ४ ) सोलापूर जिल्हाः—श्री. व्ही. सी. बावी, मेनरोड, व्हिक्टोरिया मार्केट, सोलापूर.

( ५ ) सातारा जिल्हाः—श्री. वि. गो. उमराणी, गुरुवार पेठ, कराड, जि. सातारा.

( ६ ) बेळगांवः—श्री. के. सी. पाटणकर, मार्केट, बेळगांव.

( ७ ) अहमदनगर जिल्हाः—मेसर्स एल. जी. निसरगंड आणि सन्स, सेंट्रल बँक रोड, अहमदनगर.

( ८ ) जळगांवः—मे. आयडिअल स्टोअर्स, पोलन पेठ, जळगांव ( पूर्व खानदेश ).

( ९ ) कोपरगांवः—श्री. बी. व्ही. किर्लोस्कर, कोपरगांव, ( जि. अहमदनगर ).

( १० ) नातेपुतेः—डॉ. व्ही. डी. काळे, नातेपुते, ( जि. सोलापूर ).

( ११ ) सासवडः—मेसर्स दत्त स्टोअर्स, सासवड, (जि. पुणें).

पुणें, ता. ३१।८।४६

साठे बिस्किट कंपनी
८२० भवानी पेठ, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ४ सप्टेंबर १९४६






प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.


## तहपरिषदेची आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमि

पॅरिसला भरविण्यांत आलेल्या तहपरिषदेचें काम मंदगतीनें चालू आहे. अक्ष–राष्ट्रें व त्यांची प्रभावळ यांच्याबरोबर करावयाच्या तहाचे मसुदे मार्गेच प्रसिद्ध झाले असले तरी प्रत्यक्ष मसुद्यांच्या चर्चेला अद्याप तोंड फुटलेलें नाहीं. कोणत्या राष्ट्रांबरोबर तह करतांना कोणी कसा भाग घ्यावा याबद्दलच खुद्द बड्या पांच राष्ट्रांतही एकमत होत नाहीं. उदाहरणार्थ, मागें डॅन्यूब नदीवरील वहातुकीच्या संबंधानें जसा वाद माजला होता तसाच वाद बाल्कन्स राष्ट्रांबरोबर करावयाच्या तहासंबंधीं माजलेला आहे. डॅन्यूब नदीवरील वहातूक मध्य–युरोपच्या अंतर्गत दळणवळणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे. ही वाहतूक आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखाली असावी असा इंग्लंडचा आग्रह आहे; तर उलट हा महत्त्वाचा जलमार्ग ज्या देशांतून वाहातो त्यांनींच वेगळी परिषद् भरवून या प्रश्नाची सोडवणूक करावी असा रशियाचा आग्रह आहे. तुर्कस्थान व रशिया यांच्यांतील तेढीनें गेल्या कांहीं दिवसांत पुन्हा डोकें वर काढलेलें होतें. वृत्तपत्रांतील प्रचाराची वावटळ आतां निवळली असली तरी या प्रचारामागील सूर आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बदसूर संगीतांत अजूनही उमटतच आहेत. दार्दानेल्स समुद्रधुनींतील वहातूक ज्या मॉंट्रो करारान्वयें नियंत्रित केली जात आहे, त्याचा फेरविचार व्हावा म्हणून रशियानें तुर्कस्थानला खालिता धाडलेला आहे. वास्तविक या फेरविचाराला तत्त्वतः सर्वच बड्या राष्ट्रांची संमति असतांना रशिया व तुर्कस्थान यांच्यांत या प्रश्नावर लढाई जुंपणार इतपर्यंत प्रचाराची तार खेचण्यांत आली होती. कांहीं महिन्यांपूर्वी इराणांतील परिस्थितीसंबंधींही अशाच वार्ता अँग्लो – अमेरिकन वृत्तसंस्थांनीं पसरविल्या होत्या. युद्ध संपल्यापासून अँग्लो–अमेरिकन पुरस्कारित राष्ट्रांचा पश्चिम युरोपांतील गट व सोव्हिएट रशियानें पुरस्कृत केलेला पूर्व युरोपांतील राष्ट्रांचा गट यांचे पावलोपावलीं खटके उडत असले तरी दोन्ही गटांत दहा-पंधरा वर्षांच्या अवधींत तरी युद्ध होण्याची बिलकूल शक्यता नाहीं. त्या कालानंतर काय होईल तें त्या वेळच्या लष्करी सामर्थ्यावर अवलंबून राहील आणि अमेरिकेचे माजी आरमार–मंत्री मि. नॉक्स यांनीं युद्ध चालू असतां केलेला अंदाज खरा धरला तर, त्या वेळीं युद्ध करणें अँग्लो–अमेरिकन गटाला अशक्य होईल. कर्नल नॉक्स यांच्या अंदाजाप्रमाणें सर्व युरोप–रशियासह –जर नाझी जर्मनीच्या आंकित झाला असता तर त्याचें सामर्थ्य इंग्लंड–अमेरिकेच्या तिप्पट झालें असतें. आजची परिस्थिति व त्या परिस्थितीवरून पुढील वारे कसे वाहणार याचें मोजमाप केलें तर असें दिसून येईल, कीं कमी-अधिक प्रमाणांत सर्व युरोपभर समाजवादाचें अधिराज्य आगामी कांहीं वर्षांत पसरेल. समाजवादाच्या आर्थिक पद्धतीमुळें परकीय देशावर आक्रमण करण्याची गरजच रहात नाहीं, असा दावा केला जातो. तो खरा मानल्यास आक्रमक युद्धें करूं इच्छिणारा सर्व वर्गच युरोपांतून नाहींसा होईल असें मानण्यास जागा आहे.

भविष्यकालाच्या रम्यपणाचीं अगर भेसूरपणाची कोणत्याच प्रकारचीं चित्रें मनःचक्षूसमोर उभीं करण्याचा प्रयत्न न करतां वर्तमानकाळाकडे नजर टाकली तर दोन विरुद्ध समाज–रचनांचा तत्त्वतः अंगिकार केलेल्या दोन राष्ट्रगटांत सर्व ठिकाणीं झगडा चाललेला आपणास दृष्टीस पडेल. अतिपूर्वेकडे चांग–कै–शेकच्या राष्ट्रीय सरकारला अमेरिकन सरकार मदत करीत आहे. चीनमधील वायव्य भागांत प्रस्थापित झालेल्या कम्युनिस्ट पक्षानें याविरुद्ध तक्रार केलेली असून चिनी राष्ट्रीय सरकार सर्व प्रमुख चिनी पक्षांचें प्रतिनिधिभूत करण्याच्या कामीं, मार्शल चँग मुद्दाम अडथळे आणीत आहे, असा आरोपही त्यांच्यातर्फे करण्यांत येत आहे. या प्रकरणांत एक सूचक वार्ता लक्षांत ठेविली पाहिजे. १९२७ सालीं यशस्वी झालेली चिनी क्रांति डॉ. सन-यत्-सेन यांच्या नेतृत्वाखाली झालेली होती. डॉ. सन-यत्-सेन यांची पत्नी अद्याप हयात असून, चांग-कै-शेक सरकारच्या हुकूमशाही वृत्तीबद्दल त्यांनींही जाहीरपणें कडक टीका केलेली आहे. चिनी राष्ट्रीय पक्ष आणि कम्युनिस्ट यांच्यांत तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न फसल्याचें अमेरिकेचे खास दूत मि. मार्शल यांनीं जाहीरपणें सांगितलें त्याच सुमारास चीनमध्यें सरकारी सैन्य व कम्युनिस्ट लष्कर यांच्यांत युद्ध सुरू झाल्याच्या वार्ताही आल्या आहेत. अतिपूर्वेच्या या स्फोटक परिस्थितींत ब्रिटननेंही आतां लक्ष घालण्याचें ठरविलें आहे. अमेरिकेंतील सोव्हिएट–रशियाला विरोध करणारे गट अस्तित्वांत असून त्यांच्यातर्फे असा प्रचार करण्यांत येत आहे कीं, मॅंच्यूरियांतील जपानचे कारखाने रशियानें हलविले व ते चिनी कम्युनिस्टांच्या स्वाधीन केले. या वार्तेंत खरोखर तथ्य किती हें हिंदुस्थानांत राहून समजणें शक्यच नाहीं. तथापि आंतरराष्ट्रीय परिस्थितीची नाजूक बाजू लक्षांत येण्यास मदत होते यांत शंका नाहीं.

पूर्व युरोपमधील युद्धोत्तर जमाना कसा झपाट्यानें बदलत आहे त्यासंबंधींची एक महत्त्वाची वार्ता हिंदुस्थानांतील वृत्तपत्रांतून प्रसिद्धच झालेली नाहीं. पोलंडमधील जनतेचा कौल अजमावण्यासाठीं जून अखेर तेथें सार्वत्रिक मतनोंदणी करण्यांत आली. या मतनोंदणींत तीन प्रश्नांवर होय किंवा नाहीं अशीं उत्तरें मतदारांनीं द्यावयाचीं होतीं; ते तीन प्रश्न पुढीलप्रमाणें होते. ( १ ) पोलंडच्या नवीन घटनेंत दोन विधिमंडळें असावींत कीं एकच असावें व वरिष्ठ विधिमंडळ असावें कीं नसावें. या पहिल्या प्रश्नावर १ कोटी २० लाख मतदारांपैकीं शेंकडा ७० टक्के लोकांनीं एकच विधिमंडळ व तें फक्त कनिष्ठ असावें असें मत नोंदलें. दुसरा प्रश्न असा होता कीं, पोलंडमध्यें जमिनीची जी वाटणी करण्यांत आलेली आहे ती, व मोठ्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीकरण हीं संमत आहेत कीं नाहींत ? शेंकडा ७५ मतदारांनीं या सुधारणांना अनुकूल मतें दिलीं. तिसरा प्रश्न ओडर व नीस या नद्यांपर्यंत पश्चिम पोलंडच्या ज्या सीमा वाढविण्यांत आल्या आहेत, त्या मंजूर आहेत कीं नामंजूर ? या प्रश्नासंबंधीं शेंकडा ९० टक्के मतदारांनीं मंजूर असें मत नोंदविलें. पोलंडमधील या सार्वत्रिक लोकमताच्या नोंदणींत कांहीं आक्षेपार्ह प्रकार घडल्याची ब्रिटनची तक्रार आहे; आणि म्हणून पोलंडच्या सोन्याचा साठा परत करण्याबद्दल ब्रिटनच्या मजूर सरकारनें कालहरण चालविलें आहे.

याशिवाय गेल्या महिन्यांत घडलेल्या पुढील घटनाही महत्त्वाच्या आहेत. इंग्लंड आणि इजिप्त यांच्यामधील १९३६ सालचा करार दुरुस्त करण्याचीं बोलणीं तूर्त तरी फिसकटलीं आहेत. दार्दानेल्सच्या सामुद्रधुनीवरील नियंत्रणाचा काळ्या समुद्रावरील राष्ट्रांनीं एकत्र जमून विचार करावा असा रशियाचा आग्रह आहे. उलट हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघापुढें यावा असें अमेरिका व ब्रिटन यांचें म्हणणें आहे, काळ्या समुद्रावरील राष्ट्रांपैकीं रशिया, बल्गेरिआ व रुमेनिआ एका बाजूचीं व मताचीं असणार हें उघडच आहे. अशा परिस्थितींत एकट्या तुर्कस्थानचा परिषदेंत निभाव लागणार नाहीं आणि अशा परिषदेंत रशिया आपल्या मताप्रमाणें हा प्रश्न सोडवील अशी धास्ती अँग्लो-अमेरिकन गटाला वाटत आहे. त्यामुळें या सामुद्रधुनीसंबंधींच्या तुर्कस्थानच्या धोरणाला त्यांनीं पाठिंबा दिलेला आहे. पण दार्दानेल्सच्या प्रश्नाला केवळ लष्करी वाहतुकीच्या दृष्टीनें महत्त्व नाहीं. मध्य पूर्वेतील अरब राष्ट्रांत सध्यां जी स्वातंत्र्याची लाट उसळलेली आहे, त्याचा फायदा घेऊन रशिया याही मार्गांत आपले पाय घट्ट रोवून बसेल ही दूरदृष्टीचा

भीति इंग्लंड अमेरिकेच्या पोटांत दडलेली आहे. दार्दानेल्समधील वहातुकीचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघापुढें यावा या सूचनेला रशियातर्फे असें उत्तर देण्यांत येणें शक्य आहे कीं, जिब्राल्टर सामुधुनी व पनामा कालवा यांचेहि प्रश्न संयुक्त-राष्ट्रसंघापुढें आणले जाणें इष्ट आहे. स्पेनमधील सध्यांची राजवट जागतिक शांततेला धोका आणणारी आहे असें रशियातर्फे अनेकदां सांगण्यांत आलेंच आहे. पनामाच्या कालव्याचा प्रश्न जागतिक शांततेच्या दृष्टीने आज महत्त्वाचा नसला तरी अटलँटिक सनदेप्रमाणें समुद्रस्वातंत्र्य सर्वांना लाभणें आवश्यक मानलें गेलेलें आहे आणि अशा स्वातंत्र्यासाठीं सर्व भूपृष्ठावरील मोक्याच्या ठिकाणचे जलमार्ग आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखाली असणें आवश्यक आहे असा युक्तिवाद रशियाला करतां येईल.

अशा रीतीने पॅरिसमधील तहपरिषदेंत होणाऱ्या चर्चेपेक्षा आंतरराष्ट्रीय घडामोडीच अधिक महत्त्वाच्या व सूचक आहेत. अमेरिकन युद्धमंत्री मि. पॅटरसन यांनीं अण्वस्त्रावर आंतरराष्ट्रीय नियंत्रण राहणार नाहीं असें समजून अमेरिकेच्या संरक्षणाची तरतूद करण्याचा इषारा दिला आहे. उलट बिकिनी बेटाजवळ करण्यांत आलेल्या अण्वस्त्राच्या प्रयोगाच्या वेळीं हजर असलेल्या रशियन निरीक्षकाने असें बोलून दाखविलें कीं, जग समजतें तेवढा रशिया या अण्वस्त्राबाबत मागें नाहीं. अणुशक्तीच्या नियंत्रणाबाबत अमेरिका व रशिआ यांच्यांत अद्याप एकमत झालेलें नाहीं त्याची ही जाहीर कबुलीच आहे. तथापि तहपरिषद् चालू असतांना आतांपर्यंत न भरलेली बड्या पांच राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांची परिषद् भरत आहे. यावरून मतभेदांतून मार्ग काढल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें त्या त्या राष्ट्रांतील राज्यकर्त्यांना पटलेलें आहे इतकें मात्र दिसून येतें.

## स्फुट विचार

### युद्धकालांतून शांतताकालांत स्थित्यंतर

युद्धसमाप्तीनंतर, युद्धकार्यासाठी योजनेनुसार एकवटलेली औद्योगिक शक्ति शांततेच्या काळांतील समृद्धीच्या साध्याकडे वळविण्याचें अवघड कार्य अमेरिकेनें एका वर्षापूर्वीच सुरू केलें. जे काम करण्यास तयार व समर्थ आहेत अशांना तें मिळवून देणें, लोकांच्या रहाणीचें मान हळुहळू वाढविणें, चलनविस्ताराच्या दुष्परिणामांतून अमेरिकेच्या आर्थिक संसाराचा बचाव करणें आणि शेतकरी व व्यापारी यांच्या व्यवसायाच्या वाढीस सहाय करणें असें चतुर्विध धोरण अमेरिकन सरकारनें आखलें. एका वर्षाचा आढावा घेतला असता, अमेरिकेनें तें कृतींत आणण्यांत चांगलें यश मिळविलें आहे, असें दिसून येतें. अमेरिकेनें कामाच्या ५० लक्ष नवीन जागा निर्माण करून दिल्या आहेत. एका वर्षाचे अवधींत नागरी मालाचा पुरवठा चौपट झाला आहे. १९४५ दुसऱ्या सहामहिंत २½ लक्ष नवे व्यवसाय सुरू झाले आणि आणखी नवे सुरू होत आहेत. पिकें उत्कृष्ट आलीं आहेत व शेतकऱ्यांस त्यांची किंमतहि चांगली मिळणार आहे. लोक पूर्वीपेक्षा कितीतरी जास्त जिनसा आतां खरेदूं लागले आहेत. अमेरिकेंतील ही आर्थिक प्रगति कोणीकडे आणि हिंदुस्थानाची दुरवस्था कोणीकडे! नव्या मध्यवर्ती राष्ट्रीय सरकारकडे लोकांचे डोळे लागून राहिले असल्यास नवल नाहीं.

### बँका व त्यांचे नोकर यांचेमधील वांधा—पंचाची नेमणूक होणार

फेडरेशन ऑफ बँक एम्प्लॉईजने सादर केलेल्या मागण्या मुंबईतील बँकांस मान्य नसल्याकारणानें कित्येक बँकांवर त्यांच्या नोकरांनीं संपाच्या नोटिसा बजावल्या. बँकांचें काम बंद पडल्यास जनतेची भयंकर गैरसोय होईल आणि आर्थिक व्यवहार खुंटतील, हें लक्षांत घेऊन मुंबई सरकारच्या मजूर मंत्र्यांनीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर व फेडरेशनचे अध्यक्ष ह्यांचे बरोबर वाटाघाटी सुरू केल्या. त्यांत त्यांना यश आलें असून, संप स्थगित करण्यांत आला आहे. कमिशनर ऑफ लेबरनें मध्यस्थी करावी असें ठरलें आहे. पंधरा दिवसांचे आंत तडजोड झाली नाहीं, तर उभय पक्षांस मान्य असलेल्या पंचाकडे वांधा निवाड्यासाटी सोपविण्यांत येईल. पंचाची निवड करण्यांत दोन्ही पक्षांमध्यें मतभेद निर्माण झाले, तर मजूर मंत्र्यांनीं पंच नेमावा व तो दोन्ही पक्षांनीं कबूल करावा, असें ठरलें आहे. पंचाचा निवाडा बँका आणि त्यांचे नोकर ह्या दोघांवरहि बंधनकारक होणार आहे. अशा रीतीने बँकांमधील नोकरांचा संप तूर्त तरी टळला आहे.

### मोटार-अपघातांचा विमा—एक शंका

मोटार-अपघातापासून इजा पोंचलेल्या नागरिकांना आर्थिक दृष्ट्या पोंचणारी झळ अंशतः कमी करतां यावी म्हणून हिंदुस्थान सरकारने सक्तीच्या अपघाताच्या विम्याची योजना सुरू केली आहे. आतां कायदा झाल्यामुळें त्याची अंमलबजावणी कडक रीतीनें होईलच. परंतु त्यांतूनही एखाद्या मोटारीचा असा विमा उतरण्यांत आला नसला तर अपघातांत सांपडलेल्या नागरिकाला नुकसानभरपाई कोण देणार? हा प्रश्न केवळ तात्त्विक स्वरूपाचा नाही. इंग्लंडमध्यें अशाच प्रकारचा कायदा १९३० सालीं करण्यांत आला असतांना सुद्धा कांहीं मोटारींचे विमे उतरण्यांत आले नाहींत; त्यामुळें कांहीं अपघातांतून वरील प्रश्न उपस्थित झाला. इजा पोंचलेल्या नागरिकाला मामुली कोर्टदरबाराचा मार्ग अशा परिस्थितींत मोकळा राहीलच. पण मोटारीचा विमा उतरलेला नसेल किंवा मोटारमालकाजवळ पुरेसे पैसे नसतील तर काय करावयाचें? या चमत्कारिक परिस्थितीचा उल्लेख १९३७ सालांत नेमलेल्या एका कमिटीने इंग्लंडमध्यें केलेला होता. परंतु त्यानंतर आंतरराष्ट्रीय परिस्थिति बिघडून १९३९ सालीं तर युद्धच सुरू झालें. अर्थात् हा प्रश्न तसाच भिजत पडला होता. पुढें १९४५ च्या नोव्हेंबरमध्यें मोटारींच्या अपघातांचे विमे उतरणाऱ्या कंपन्यांनीं वाहतूक खात्याच्या मंत्र्यांशीं एक करार केला. सदर करारान्वयें अशा सर्व कंपन्यांनीं एक फंड उभारून विमा न उतरलेल्या मोटारींच्या अपघातांतील व्यक्तिस नुकसानभरपाई देण्याचें कबूल केलें. त्यानंतर आतां मोटार इन्शुअरर्स ब्यूरो नांवाची एक कंपनीच काढण्यांत आलेली आहे. सदर कंपनींतील जोखमीची वाटणी हमी (Guarantee) देऊन करण्यांत आलेली आहे. या कंपनीचे दोन प्रमुख हेतु आहेत. (१) वरीलसारख्या अपघातासंबंधीं वहातूकखात्याच्या मंत्र्याशीं करार करणें व (२) जोखमीची वाटणी करण्यासाठीं मोटार अपघाताचे विमे उतरणाऱ्या संस्थांशीं व कंपन्यांशीं करार करणें. अशा रीतीनें क्वचित् उद्भवणाऱ्या व उद्भवल्यास कायदेशीर अडचण उत्पन्न होणाऱ्या प्रसंगांची तरतूद करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांतही अशाच प्रकारची कांहीं व्यवस्था होणें जरूर आहे.

**बनावट नोटा**—१९४५–४६ मध्यें बनावट नोटा जितक्या आढळल्या, तितक्या आतांपर्यंत कोणत्याच वर्षी आढळल्या नव्हत्या. १९४३–४४ मध्यें १३,२३९; १९४४–४५ मध्यें १२,६७५ व १९४५–४६ मध्यें २३,७९२ अशी त्या नोटांची संख्या आहे. १९४५–४६ मध्यें एक रुपयावाल्या बनावट नोटा सर्वांत जास्त लाहोरमध्यें सांपडल्या. त्यांची संख्या ९,१४५ भरली. दहा रुपयेवाल्या नोटांचा प्रसार कलकत्ता व रंगून येथेंच अधिक होता.

**रशियाच्या ताब्यांत महत्त्वाचे जर्मन कारखाने**-रशियानें स्वतःच्या मालकीचे म्हणून २०० वर महत्त्वाचे जर्मन कारखाने आपल्या ताब्यांत घेतले आहेत. कोणत्याही प्रकारची अधिकृत घोषणा न करतां रशियानें गेल्या चार आठवड्यांत आपल्या ताब्यांतील मुलूख कायमचाच आपल्या राष्ट्रांत सामील करण्याची कारवाई केल्यामुळें जवळ जवळ चार लक्ष जर्मन कामगार रशियाचे नोकर होतील.

**जपानी राजकुमाराची अमेरिकन स्त्री शिक्षिका**—फिलाडेल्फिया येथील मिसेस एलिझाबेथ ग्रे व्हाइनिंग ह्या जपानी राजकुमाराला शिकवणार आहेत. मिसेस व्हाइनिंग पीअर्स स्कूलमध्येंही शिकवतील. एक सामान्य विद्यार्थी ह्या नात्यानें राजकुमार पीअर्स स्कूलमध्यें शिक्षण घेत आहेतच.

## सावकारीच्या व्यवहारांचें नियंत्रण

### नियोजित कायद्यांतील महत्त्वाच्या बाबी

#### व्यवहारक्षेत्र

(१) हा कायदा सबंध मुंबई प्रांतास लागू आहे. सरकार ठरवील त्यां दिवशीं तो कायदा अमलांत येईल.

(२) सरकार रजिस्ट्रार जनरल, रजिस्ट्रार व असिस्टंट रजिस्ट्रार नेमील व त्यांचें कार्यक्षेत्र ठरवून देईल.

(३) प्रत्येक असिस्टंट रजिस्ट्रार आपल्या क्षेत्रांतील सावकारांची एक यादी तयार राखील.

#### लायसेन्स

(४) ज्या क्षेत्रांत व्यवहाराचा लायसेन्स दिलेला असेल, त्या क्षेत्रांतच सावकारानें आपला व्यवहार केला पाहिजे, आणि त्यानें लायसेन्सच्या अटी पाळल्या पाहिजेत.

(५) प्रत्येक सावकारानें दरसाल ठराविक नमुन्याप्रमाणें लायसेन्स-साठीं अर्ज केला पाहिजे. बँकेनें सुद्धां लायसेन्स काढला पाहिजे. गुंतवावयाच्या भांडवलाचा निर्देश अर्जांत केला पाहिजे. लायसेन्स फी ५ रुपये आहे. रजिस्ट्रारनें लायसेन्स देण्याचें नाकारल्यास त्यावर रजिस्ट्रार जनरलकडे अपील करतां येईल.

(६) वर्षाचे अवधींत केव्हांहि लायसेन्स काढला तरी त्याची मुदत त्यानंतरच्या ३१ मार्चं रोजीं संपेल.

(७) कायदा अंमलांत आल्यानंतर सहा महिन्यांचे नंतर, लायसेन्स नसलेल्या सावकाराचे बाजूनें कोणतेंहि कोर्ट डिक्री करूं शकणार नाहीं. जेव्हां कर्ज दिलें त्यावेळीं किंवा दाव्याचा विषय निर्माण झाला त्यावेळीं सावकाराजवळ लायसेन्स असला, तर त्यास डिक्री मिळूं शकेल.

दावा चालू असतांना, सावकाराजवळ लायसेन्स नव्हता असें आढळून आलें, तर सावकाराचे अर्जावरून कोर्ट दावा तहकूब करूं शकेल व तीन महिन्यांचे आंत लायसेन्स दाखल करण्याचा त्यास हुकूम देऊं शकेल.

५०० रुपयांपर्यंत त्याबाबत दंड करण्याचा अधिकार कोर्टास राहील. सावकारानें लायसेन्स काढला नव्हता, त्यास योग्य कारण होतें असें कोर्टास आढळलें तर दंड माफ करण्याचा अधिकार कोर्टास आहे. ठराविक तीन महिन्यांत किंवा त्यानंतर दिलेल्या मुदतींतहि सावकारानें लायसेन्स दाखल केला नाहीं, तर दावा काढून टाकला जाईल.


(८) हा कायदा अमलांत येणाऱ्या तारखेपूर्वीच्या कर्जास वरील कलम लागू नाहीं.

#### अधिकाऱ्यांस सिव्हिल कोर्टाचे अधिकार

(९) रजिस्ट्रार जनरल, रजिस्ट्रार व असिस्टंट रजिस्ट्रार ह्यांस सिव्हिल कोर्टाचे अधिकार देण्यांत आले आहेत. म्हणजे, कोणासहि ते हजर व्हावयास लावूं शकतील व त्याचा शपथेवर जबाब घेऊं शकतील. दस्तैवज व कागदपत्र दाखल करविण्याचा त्यांस अधिकार आहे. साक्षीदारांच्या तपासणीसाठीं कमिशन पाठवणें, ॲफिडेव्हिट घेणें, हेंहि त्यांच्या अधिकारकक्षेंत आहे.

#### हिशेबाचीं बंधनें

(१०) प्रत्येक सावकारानें ठराविक पद्धतीचें कॅशबुक व लेजर ह्यांत हिशेब लिहिले पाहिजेत. कर्ज दिलें कीं ३० दिवसांचे आंत त्यानें कर्जाची रकम, कर्जाची तारीख, परतफेडीची तारीख, तारण, कर्जदाराचें व सावकाराचें नांव आणि पत्ता व व्याजाचा दर ह्याचा तपशील कर्जदारास पुरवला पाहिजे व त्याची प्रत असिस्टंट रजिस्ट्रारकडे धाडली पाहिजे. कर्ज फेडल्यावर, कर्जदारानें दिलेल्या कागदांवर त्याची नोंद केली पाहिजे. कर्जदारानें दिलेल्या कोणत्याहि रकमेची त्यास असंदिग्ध व पुरी पावती दिली पाहिजे. कर्जदारास दरसाल त्याच्या खात्याचा तक्ता दिला पाहिजे व त्याची प्रत असिस्टंट रजिस्ट्रारकडे धाडली पाहिजे. कर्जदारानें हा तक्ता बरोबर किंवा चूक असल्याचें मान्य करण्याची जबाबदारी त्याचेवर नाहीं. बँकांच्या कर्जास हे वरील नियम लागू नाहींत.

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
पैसा व ज्ञान मिळवा !
श्रीमंत कसें व्हावें–संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा ! किं. १॥ रु.
१०० टक्के यश–हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.
काम आणि कामिनी–तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें ! अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.
मृत्युलोकचा प्रवास–मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

बिनचूकच्या माहितीनें
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट: सितारान एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
:इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत:



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

(११) मुदलापेक्षां ज्यास्त व्याजाची डिक्री कोर्ट देणार नाहीं.

### कमाल व्याज ठरविलें जाणार

(१२) तारणावर व विना–तारण दिलेल्या कर्जावरील व्याजाचे कमाल दर ठरवून देण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आहे.

(१३) मालमत्तेच्या मालकीविषयीं चौकशी, स्टँप, रजिस्ट्रेशन, इत्यादि खर्चांसेरीज इतर गैरवाजवी कारणाकरितां कर्जदाराकडून सावकारानें रकम घेतां कामा नये.

(१४) कोणत्याहि व्यवहाराची पुनः छाननी करून कर्जदाराकडून घेतलेलें व्याज कमी करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

### कर्जदारास सतावतां कामा नये

(१५) कोणीहि कर्जदारास कर्जवसुलीसाठीं सतावलें किंवा सतावण्यास सहाय केलें तर त्यास ३ महिनेपर्यंत कैद व ५०० रुपये दंडापर्यंत शिक्षा सांगितली आहे. अडवणें, धाक घालणें, मागोमाग जाणें, मालमत्तेशीं लुडबुड करणें, मालमत्तेचा उपयोग करूं न देणें, रहाण्याच्या किंवा कामाच्या ठिकाणीं घिरट्या घालणें, कोणत्याहि प्रकारें त्रास देणें, चिडवणें, परतफेडीसाठीं गैरवाजवी रीतीनें व एकसारखी मागणी करणें, हे सर्व प्रकार 'सतावणे'च्या व्याख्येंत येतात.

---

## हातमागांनीं हातकताईचें सूत वापरावें

(अर्थमंत्रि, श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांचें मुं. प्रां. विणकर परिषदेंतील भाषण)

" कापडाच्या उत्पादनांत हातमागास महत्त्वाचें स्थान आहे आणि हातमागाचा धंदा थोडेसें सहाय्य मिळाल्यास भरभराटीस येण्याजोगा आहे. हातमागांनीं कोणतें कापड विणावें व गिरण्यांनीं कोणतें कापड तयार करावें हें ठरवून दिल्यास गिरण्यांची बाधक स्पर्धा टळण्याजोगी आहे. मध्यस्त नाहींसा केला पाहिजे किंवा त्याच्या कारवायांवर बंधन घातलें पाहिजे. मध्यस्त नाहींसा करण्याचें सर्वोत्कृष्ट साधन म्हणजे खरेदी-विक्री सहकारी संस्था स्थापन करणें होय. ह्या सोसायट्यांनीं विणकरांस कच्चा माल द्यावा व त्यांच्या पक्क्या मालाची विक्री करावी. ज्या विणकरांचे एक-दोनच हातमाग असतील अशांनाच सोसायटीचे सभासद होतां यावें. सहकारी स्पिनिंग मिल काढावी, अशी काहींची सूचना आहे; परंतु भांडवल मिळण्याची अडचण, वेगवेगळ्या नंबरांचें सूत, स्पर्धा इत्यादि त्यांत बिकट प्रश्न आहेत. विणकऱ्यांनीं हातकताईच्या सुतावरच जास्त अवलंबून रहाणें इष्ट होईल. हातकताईचें सूत विणकरांत अधिक लोकप्रिय होईल, अशी पुढाऱ्यांनीं खटपट करावी. कापडाचे बाबतींत प्रत्येक खेडें स्वयंपूर्ण झालें पाहिजे. त्यामुळें प्रत्येकास वर्षभर काम मिळेल. ह्या धंद्यांतील कामगारांना योग्य वेतन मिळण्याची तरतूद केली पाहिजे. हातमागाच्या धंद्याची सहकारी पद्धतीनेंच संघटना करणें अत्यावश्यक आहे. "

---

## शेतजमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण

शेतकीच्या जमिनीचे तुकडे पडण्यास प्रतिबंध करून तिचें एकीकरण करण्याच्या दृष्टीनें एक बिल तयार करण्यांत आलें असून मुंबई सरकारनें तें प्रसिद्ध केलें आहे.

जमिनीचे तुकडे पडून तिचे अनेक पोटभाग झाल्यामुळें या प्रांतांतील शेतकीची अत्यंत हानि झाली आहे. अशा तुकड्यांची लागवड करण्यांत काळाचा अपव्यय होतो व मजुरी फुकट जाते. त्यामुळें बांधताली घालणें वगैरेसारख्या सुधारणा करणेंहि अशक्य होतें, कारण जमिनीचा हा पोटविभाग इतका लहान असतो कीं, त्यावर सुधारणा करणें आर्थिक दृष्ट्या फायदेशीर होत नाहीं. अशारीतीनें तुकडे अथवा पोटविभाग पडलेल्या जमिनींची अधिकाधिक खराबी होत जाईल व तिच्या उत्पादनक्षमतेचा ऱ्हास होईल.

जमिनीची ही जी हानि होत आहे त्यावर इलाज म्हणून वर म्हटलेलें बिल तयार करण्यांत आलें आहे; त्याअन्वयें जमिनीचे आणखी तुकडे पडण्यास आळा बसेल आणि पोटविभागांचें एकीकरण होईल.


शेअर्स विकणें आहेत:—
गोवर्धन डेअरी फार्म्स लि.
गोवर्धनवाडी, पुणें १.









डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुले सशक्त होतात

सांडू प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड
पुणें चीफ एजंट:—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें









पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा

डॉ. गोवंडे यांचे ज्वरबिंदू

रोग जंतू नाशक व हवा शुद्धि कारक
निलगिरी

वर्ग पुस्तकें बंद
टाटा पॉवर १२।८।४६
आन्ध्र व्हॅली २८।८।४६

# मुंबई शेअर बाजार
(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याजवजा
इंदूर माळवा रु ४१-०-० दि. ३-९-४६
टाटा डिफर्ड रु. १२९-८-९ } दि.१०-९ ४६
,, ऑ. रु. २३-०-० }
कोहिनूर रु. १२ दि. १७-९-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २७।८।४६ | बुधवार २८।८।४६ | गुरुवार २९।८।४६ | शुक्रवार ३०।८।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | आगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | ३३५०—० | | |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ५९० – ० | | |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | ३१५५—० | | |
| ७०२; ५६६ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | १०६०—० | | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ८३६—० | | |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | | ४६३—० | | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | ४३५—० | | |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ४२०—० | | |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | बाजार बंद | ४७४-८ | बाजार बंद | बाजार बंद |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ५-१०-६ | | |
| ११७१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | २६—८ | | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | | ५-१०-० | | |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ८९७-८ | | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ११० | | २५०—० | | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | ३१६—० | | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ७७५—० | | |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | ५२—० | | |

## कै. रा. ब. चितळे-श्री. फिरोदिया ह्यांचीं तैलचित्रें

नगर सेंट्रल बँकेचे संस्थापक व माजी चेअरमन (१९१० ते १९३०) कै. रा. ब. ग. रु. चितळे व माजी चेअरमन (१९३० ते १९४२) श्री. कुं. सो. फिरोदिया (मुंबई प्रांतिक असेंब्लीचे स्पीकर) यांचे तैलचित्रांचा अनावरण समारंभ मुंबई सरकारचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता यांचे हस्तें ता. ४।९।४६ रोजीं सकाळीं ९ वाजतां नगर येथें होणार आहे. तैलचित्रें हैद्राबादचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. आर. डब्ल्यू. देऊसकर यांचेकडून बँकेनें करून घेतलीं आहेत. आपल्या मुक्कामांत श्री. मेहता हे व्यापारी असोसिएशन, श्री. लुकतुके यांचा ग्रामोद्योगी कागद कारखाना व इतर संस्था ह्यांस भेट देणार आहेत.

## विजेवरील सरचार्ज चालू ठेवणारें बिल

विजेवरील सरचार्ज चालू ठेवणारें बिल—युद्धपरिस्थितीमुळें विजेच्या उत्पादनाचा वाढलेला खर्च ग्राहकांकडून वसूल करण्याचा डिफेन्स ऑफ इंडिया रूल्सखालील एका ऑर्डरीनें लायसेन्सवाल्यांना अधिकार दिला होता. हे रूल्स १ ऑक्टोबर १९४६ नंतर अंमलांत रहाणार नसल्यानें, ही सवलत चालू राखण्यासाठीं मुंबई सरकार एक बिल पुढें मांडणार आहे.


दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कराड

## भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची एकोणतिसावी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख १५।९।४६ रोजीं दोनप्रहरीं तीन वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. त्यावेळीं बँकेचा १९४५-४६ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व व्हाइस-चेअरमन यांची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती वगैरे कामें केलीं जातील. तरी सदरवेळीं सभासदांनीं येण्याचें करावें अशी विनंति आहे.

कराड तारीख १।९।४६ } सि. कृ. एकांडे, मॅनेजिंग डायरेक्टर.

पॉटरी कारखान्याच्या उभारणीसाठी
ठेवी घेणें आहेत
ब्रिप्ला कमर्शिअल कं. लि.
सरस्वती-विलास, लक्ष्मी रोड, पुणें २.
ठेवींचे दर
एक वर्ष-४½%; तीन वर्षे-५%; पांच वर्षे-६%.
अर्जाचा नमुना व माहितिपत्रक मागवा.
सोमण रानडे अँण्ड को., मॅनेजिंग एजण्टस्.

—दररोज लागणारें ताजें—
दहीं
शेरास १० आणे
म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.



'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी
९६ नारायण पेठ, पुणें २.

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

# गव्हर्नमेंट ऑफ इंडिया

## ३॥ टक्क्याच्या बिनफेडीच्या कर्जात बदल

मुदतः—१५ ऑगस्ट १९४६ पासून १६ सप्टेंबर १९४६ पर्यंत
(दोनही दिवस धरून)

(१) ३॥ टक्याचे १८४२–४३ चे कर्जरोखे
(२) ३॥ टक्याचे १८५४–५५ चे कर्जरोखे
(३) ३॥ टक्याचे १८६५ चे कर्जरोखे
(४) ३॥ टक्याचे १८७९ चे कर्जरोखे
आणि (५) ३॥ टक्याचे १९००–०१ चे कर्जरोखे

(गव्हर्नमेंट नोटीस नं. डी. / ४७६६–बी/४६, २४ मे १९४६ प्रमाणें परतफेडीसाठीं जाहिर झालेले)

धारण करणारांना (१) १९४६ चे ३ टक्याचे (दर्शनी) १०० रु. किंमतीबद्दली १०० रु. किंमतीचे कर्जरोखे किंवा (२) (दर्शनी) १०० रु. किंमतीच्या कर्जरोख्याबद्दली ९९ रु. किंमतीचे कर्जरोखे घेतां येतील.

३ टक्यांचे १९४६ चे बदली कर्जरोख्यांची १६ सप्टेंबर १९८६ पर्यंत परतफेड होऊं शकणार नाहीं. आणि हे कर्जरोखे धारण करणाराला ४० वर्षेपर्यंत ३ टक्के व्याज मिळण्याची हमी दिली जाईल.

रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास येथील शाखेमध्यें आणि इतरत्र इंपीरियल बँकेच्या शाखेंत व सर्व ठिकाणीं सरकारी तिजोरीमध्यें अर्ज घेतले जातील.

सविस्तर माहितीसाठीं यापैकीं कोणत्याही कचेरीस, शाखेस किंवा तिजोरीस लिहा.

(हिंदुस्थान सरकारच्या फायनान्स खात्याचें प्रकाशन)

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।९ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.